सत्यमेव जयते

विधानपरिषद विनंती-अर्ज समिती

(२०१७-२०१८)

“ राज्यात अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग प्रभाविपणे राबविण्याची आवश्यकता असणेबाबत ” या विषयावरील ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा

अहवाल

(दिनांक फेब्रुवारी, २०१९ रोजी विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
फेब्रुवारी २०१९

विधानपरिषद विनंती-अर्ज समिती

(२०१७-२०१८)

“ राज्यात अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग प्रभाविपणे राबविण्याची आवश्यकता असणेबाबत ” या विषयावरील ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा

अहवाल

एचबी २४१४–१

विनंती अर्ज समिती
(२०१७-२०१८)

*(१) श्री. शरद रणपिसे, वि.प.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख
(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.
(३) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
**(४) श्री. किरण पावसकर, वि.प.स.

विशेष निमंत्रित

१ ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.
२ ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.
३ प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री. जितेंद्र भोळे, सचिव (का.)
श्री. यु. के. चव्हाण, सचिव (एम)
श्री. विलास आठवले, सहसचिव (२) (का.)
श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

---

*श्री. माणिकराव ठाकरे, मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख यांची दिनांक २७ जुलै २०१८ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागी श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांची कार्यकारी समिती प्रमुख म्हणून दिनांक १९ सप्टेंबर २०१८ रोजी नामनियुक्ती केली आहे.

**श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै २०१८ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागी श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांची दिनांक १९ सप्टेंबर २०१८ रोजी सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

विनंती अर्ज समिती
(२०१६-२०१७)

(१) श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख
(२) *श्री. गिरीष व्यास, वि.प.स.
(३) *प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
(४) *श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(५) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

विशेष निमंत्रित

श्री. कपिल पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री. यु. के. चव्हाण, सचिव
श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

---

*सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, प्रकाश बिनसाळे, अमरनाथ राजुरकर, वि.प.स. यांच्या रिक्त झालेल्या जागी अनुक्रमे सर्वश्री गिरीष व्यास, तानाजी सावंत, आनंद ठाकूर वि.प.स यांची दिनांक २७ जानेवारी २०१७ रोजी नामनियुक्ती करण्यात आली आहे.

प्रस्तावना

"राज्यात अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग प्रभाविपणे राबविण्याची आवश्यकता असणेबाबत" या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य, ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. यांनी दिनांक ५ एप्रिल, २०१७ रोजी दिली व दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी प्रस्तुतचा विनंती अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती अर्ज त्याच दिवशी विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात आला. (**परिशिष्ट-एक**)

विनंती अर्जात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांबाबत शासनाकडून आवश्यक ती माहिती मिळावी म्हणून उक्त विनंती अर्ज उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभाग, कृषि व पदुम (कृषि) विभाग तसेच सहकार, पणन व वस्त्रोद्योग (पणन) विभागांकडे पाठविण्यात आला. यासंबंधीची माहिती उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग), कृषि व पदुम व सहकार व पणन (पणन) विभागाकडून दिनांक २५ सप्टेंबर, २०१७, २७ सप्टेंबर २०१७, २८ सप्टेंबर, २०१७ व दिनांक ८ जून, २०१८ रोजी प्राप्त झाली.

समितीने विनंती-अर्जाच्या संदर्भात विनंती अर्ज सादर करणा-या मूळ विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव व अन्य अधिका-यांची दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ व ११ जून, २०१८ रोजी साक्षी नोंदविल्या.

विनंती-अर्जासंबंधी विभागाने पाठविलेली माहिती (परिशिष्ट-दोन) तसेच साक्षीच्या वेळी समितीस मिळालेली अधिक माहिती याचा सर्वंकष विचार करून समितीने अहवाल तयार केला व दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या बैठकीत संमत केला.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०१९.

शरद रणपिसे,
कार्यकारी समिती प्रमुख,
विधानपरिषद विनंती-अर्ज समिती.

अहवाल

मी विधानपरिषद विनंती-अर्ज समितीचा समिती प्रमुख समितीच्या वतीने हा अहवाल सादर करीत आहे.

''राज्यात अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग प्रभाविपणे राबविण्याची आवश्यकता असणेबाबत'' याविषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. यांनी दिनांक ५ एप्रिल, २०१७ रोजी दिली व दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी प्रस्तुतचा विनंती अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती अर्ज त्याच दिवशी विनंती अर्जसमिती कडे सुपूर्द करण्यात आला. **(परिशिष्ट-एक)**

अर्जदारांनी विनंती अर्जात नमूद केले आहे की, महाराष्ट्र राज्यात अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता आहे. यामुळे शेतीमालाला योग्य भाव मिळतील. ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होईल व परदेशी चलन मोठ्या प्रमाणात मिळू शकेल. शासन निर्णय ५ जानेवारी, २०१३ नुसार जिल्हास्तरावर अन्नप्रक्रिया अभियान समिती गठित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र या निर्णयाची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे अन्नप्रक्रिया अभियान कागदावरच राहिले आहे. अन्नप्रक्रिया फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग विकासासाठी स्वतंत्र विभाग सुरू करण्यात यावा. प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र उद्योग प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात यावे. तालुका स्तरावर प्रशिक्षण देण्यासाठी फिरते प्रक्रिया केंद्र स्थापन करावेत व यासाठी शासनाने मदत करावी. फळे आणि भाजीपाला प्रक्रिया उद्योग महासंघास शासनाची मान्यता मिळावी. या संघाला राज्यशासनाने पुणे येथे प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यासाठी जागा व तरतुद उपलब्ध करून द्यावी. अन्नप्रक्रीया उद्योगाला डी + झोन सुविधा द्याव्यात. प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी १०० टक्के स्टॅप ड्युटी माफ असावी. या उद्योगाला कृषीचा भाग म्हणून कृषीच्या दरानुसार विद्युत पुरवठा मिळावा. या उद्योगासाठी लागणारे पाणी शेतीच्या धर्तीवर मिळावे, प्रक्रिया उद्योगाला व्हॅटमधून सुट मिळावी. प्रक्रिया उद्योगासाठी एक खिडकी योजना सुरू करावी व सर्व परवाने एकत्र मिळण्याची व्यवस्था व्हावी. भरड धान्य योजना प्रक्रिया उद्योगाप्रमाणे फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योगासाठी लागणारी मशनरी, तज्ञ मार्गदर्शन, खेळते भांडवल, प्रशिक्षण, विक्री व्यवस्था इत्यादीची सुविधा उपलब्ध करून द्याव्यात या आणि अशा अनेक मागण्यांच्या अनुषंगाने दिलासा देण्याबाबत विनंती अर्ज समितीतर्फे शिफारस करण्याबाबतची मागणी विनंती अर्जात केलेली आहे.

समितीला दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग (पणन) विभागाने पाठविलेल्या माहितीत (**परिशिष्ट दोन**) मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

मुद्दा क्र.	मुद्दा	माहिती
९	**महाराष्ट्र शासन राजपत्र मंगळवार दिनांक १६ जून, २०१५ ला उल्लेख केल्याप्रमाणे प्रत्येक बाजार समित्यांवर** अन्न प्रक्रिया संघाच्या तज्ञाची नियुक्ती व्हावी. प्रत्येक बाजार समितींनी अन्न प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण सुरू करावे.	महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनयमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १६ जून, २०१५ अध्यादेश काढण्यात आलेला आहे. त्यामध्ये (एक) ज्या बाजार समितीचे मागील लगतच्या बाजार वर्षात कलम ३१ च्या पोट कलम (१) अन्वये बसविलेल्या व गोळा केलेल्या फी पासुन मिळणारे उत्पन्न हे, पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल अशा प्रत्येक बाजार समितीवर चार विशेष निमंत्रित नियुक्त करता येतील, आणि (२) ज्या बाजार समितीचे मागील लगतच्या बाजार वर्षात कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये बसविलेल्या व गोळा केलेल्या फी पासून मिळणारे उत्पन्न हे पाच कोटी रुपयांपर्यंत असेल अशा प्रत्येक बाजार समितीवर दोन विशेष निमंत्रित नियुक्त करता येतील अशी तरतूद आहे. ज्या कृषि, कृषि प्रक्रिया, कृषि पणन, कायदा, अर्थशास्त्र किंवा वाणिज्य या क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती असतील. अन्न प्रक्रिया उद्योगाबाबत प्रशिक्षण देणे ही बाब उद्योग विभागाशी निगडित असून कृषि उत्पन्न समिती बाजार समितीशी निगडित नाही.

कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना १:९ या प्रमाणात रा.स.वि.नि. योजनेअंतर्गत अर्थसहाय्य योजनेची माहिती—

राज्यातील शेतक-यांनी उत्पादित केलेल्या शेतीमालास योग्य व रास्त भाव मिळावा व त्याअनुषंगाने पूरक रोजगार निर्मिती व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजनेअंतर्गत राज्यातील कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना कर्ज आणि शासकीय भागभांडवल उपलब्ध करून देण्याकरिता शासनहमीवर पुढीलप्रमाणे आकृतीबंध लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय शासन निर्णय क्र. प्रक्रिया-११२००४/प्र.क्र.१६२(अ)/९-स, दि. १२ ऑक्टोबर, २००७ अन्वये शासनाने घेतला आहे.

(रुपये लाखात)

अ.क्र.	तपशिल	प्रक्रल्प किंमतीच्या प्रमाणात अर्थसहायाची टक्केवारी	आर्थिकबंध (कमाल रु. ५००.०० लाख)
१.	राज्य शासनाच्या हमीवर राष्ट्रीय सहकारी विकास निगम किंवा इतर वित्तीय संस्थेकडून कर्ज.	६०%	३००.००
२.	राज्य शासनाचे भाग-भांडवल	३६%	१८०.००
३.	संस्थेचे स्व-भागभांडवल	०४%	२०.००
	एकूण	१००%	५००.००

०२. सदर योजनेअंतर्गत सन २०१५-१६ अखेर वरील आकृतीबंधानुसार एकूण ११२ कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना एकूण रुपये ३३४.३६ कोटी (रासविनि कर्ज रु. २१५.४९ कोटी रासविनि भागभांडवल रु. ८३.१९ कोटी व शासकीय भागभांडवल रु. ३५.६८ कोटी) अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहेत. ११२ कृषि प्रक्रिया सहकारी संस्थापैकी ५ संस्थांनी संपूर्ण अर्थसहाय्याची परतफेड केली आहे.

०३. सद्यःस्थितीमध्ये उपरोक्त ११२ संस्थापैकी २५ संस्था बंद, १४ संस्था अवसायनामध्ये, २७ संस्था उभारणीखाली, ४६ संस्था चालू आहेत. सदर १०७ कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांचे एकूण रु. २३२.५९ कोटी (रासविनि कर्ज रु. १६५.१२ कोटी, रासविनि भागभांडवल रु. ५२.१९ कोटी व शासकीय भागभांडवल रु. १५.२८ कोटी) थकीत आहे.

०४. शासनाने मान्यता प्रदान केलेल्या एकूण १८ कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना अर्थसहाय्य वितरीत करण्याचे शासनावर सद्यःस्थितीत दायित्व आहे.

समितीच्या दिनांक २७ सप्टेंबर २०१७ रोजीच्या कृषि व पदुम (कृषि) विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट दोन-अ) मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

मुद्दा क्रमांक १ :- शासन निर्णय ५ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयानुसार जिल्हास्तरावर अन्नप्रक्रिया अभियान समिती गठित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र या निर्णयाची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे अन्नप्रक्रिया अभियान कागदावरच राहिले आहे.

वस्तुस्थिती :-केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न प्रक्रिया अभियान ही योजना सन २०१५-१६ या आर्थिक वर्षापासून बंद केलेली असून सदर योजना राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात चालू ठेवावी किंवा कसे याबाबत निर्णय घेण्याचे केंद्र शासनाने कळविले होते. त्यानुसार राज्याच्या अर्थसहाय्यातून राबविण्यात येणारी कृषी व अन्न प्रक्रियाही नवीन योजना राज्यात राबविण्याबाबतचा धोरणात्मक निर्णयाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. दिनांक ३० मे २०१७ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये ''मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना'' राज्यात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून दिनांक २० जून, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवीन योजना राज्यात सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

मुद्दा क्रमांक २ :-अन्न प्रक्रिया फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग विकासासाठी स्वतंत्र विभाग सुरू करण्यात यावा.

वस्तुस्थिती :-अन्न प्रक्रिया फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग विकासासाठी विकास (उद्योग) यांचे अधिपत्याखाली कृषी प्रक्रियेकरिता स्वतंत्र विभाग निर्माण करण्यास मा. मुख्यमंत्री महोदयांनी अनुकूलता दर्शविली असून कृषी विभाग व उद्योग विभाग संयुक्तीकरित्या स्वतंत्र विभाग/ यंत्रणा सुरू करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

मुद्दा क्रमांक ३ :-प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात यावे. तालुका स्तरावर प्रशिक्षण देण्यासाठी फिरते प्रक्रिया व केंद्र स्थापन करावीत यासाठी शासनाने मदत करावी.

वस्तुस्थिती :-दिनांक २० जून, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवीन योजना राज्यात सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयात नवीन योजनेच्या स्वरूपात प्रशिक्षणाबाबत खालीलप्रमाणे तरतूद केलेली आहे.

मुद्दा क्रमांक ४.३ मनुष्यबळ निर्मिती व विकास योजना :-

इ) पात्रउद्योग :- अन्न प्रक्रिया प्रकल्पांकरिता Central Food Technological Reaserch Institute (CFTRI), National Institute of Food Technology Enterpreneurship and Management (NIFTEM), State Agriculture Universities (SAU) इत्यादी केंद्र/ राज्य संस्थांकडून प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मिती.

ई) आर्थिक सहाय्य :- प्रशिक्षण शुल्काच्या ५० टक्के.

केंद्र शासनाच्या अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाने मॉडेल फुड प्रोसेसिंग पॉलिसीचा मसुदा राज्य शासनास पाठविला असून राज्याने या मसुद्यानुसार आपले अन्न प्रक्रिया धोरण निश्चित करण्यास कळविले आहे. केंद्र शासनाने दिलेल्या प्रारूपानुसार राज्य शासनाने स्वतःचे अन्न प्रक्रिया धोरण २०१७ चे प्रारूप तयार केले असून सदर धोरणाच्या मसुद्यातील मुद्दे अनेक विभागाशी संबंधित आहे. यास्तव सदर धोरणाचा मसुदा उपरोक्त विभागांकडे अभिप्रायार्थ

पाठविण्यात आला. त्यापैकी काही विभागाचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत. अन्न प्रक्रिया व कृषी उद्योग प्रक्रिया उद्योग धोरण तयार करण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १३ सप्टेंबर २०१७ रोजी बैठक घेण्यात आली. त्याप्रमाणे कार्यवाही सुरू आहे.

समितीच्या दिनांक २८ सप्टेंबर २०१७ रोजीच्या उद्योग ऊर्जा व कामगार (उद्योग) विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट दोन-ब) मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

मुद्दा क्र.	मुद्दा	अभिप्राय
५	अन्न प्रक्रिया उद्योगाला डी + झोनच्या सुविधा द्याव्यात	शासनामार्फत उद्योगांना चालना देण्यासाठी नवीन औद्योगिक धोरण-२०१३ नुसार सामुहिक प्रोत्साहन योजना राबविण्यात येते. दिनांक १ एप्रिल २०१३ च्या शासन निर्णयाने शासनाने साप्रोयो-२०१३ अंमलात आणली असून योजनेचा कालावधी १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१८ असा आहे. सदर योजने [परिच्छेद क्र. ४.१ (ब)] नुसार राज्यात स्थापन होणा-या अन्न व कृषी प्रक्रिया उद्योगास इतर उद्योग घटकापेक्षा वाढीव १० टक्के अनुदान व अनुदान उपभोगण्याचा कालावधी एक वर्ष वाढवून देण्यात आलेला आहे.
६	कृषी उद्योग उभारणीसाठी १०० टक्के स्टॅम्पड्यूटी माफ असावी. या उद्योगाला कृषीचा भाग म्हणून कृषीच्या दरानुसार विद्युत पुरवठा मिळावा. या उद्योगासाठी लागणारे पाणी शेतीच्या धर्तीवर मिळावे, प्रक्रिया उद्योगाला व्हॅटमधून सूट मिळावी.	१) सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१३ अंतर्गत राज्यामध्ये अ व ब वर्गीकरण तालुक्यांव्यतिरिक्त इतर ठिकाणी स्थापित होणा-या सर्व प्रकारच्या नवीन/विस्तारीकरण प्रकल्पांना जमीन संपादनासाठी/जमीनीचा/गाळ्याचा भाडेपट्टा करार व भाडेपट्टा कराराचे हस्तांतरण तसेच दिर्घ मुदतीच्या कर्जाचे गहाणखत करण्यासाठी मुद्रांक शुल्क माफी अनुज्ञेय आहे. २) राज्यातील अन्न प्रक्रिया उद्योगास विजदर संबंधित पात्र घटकांना खालीलप्रमाणे प्रोत्साहन अनुदान अनुज्ञेय आहेत. १) विद्युत शुल्क माफी २) विद्युतदर अनुदान ३) GST पात्र घटकांना GST वर आधारीत औद्योगिक प्रोत्साहन अनुदान (IPS) अनुज्ञेय करण्यात येत आहे.
८	अन्न प्रक्रिया उद्योगासाठी एम.आय.डी.सी. मध्ये तयार जागा व यंत्रसामुग्री उपलब्ध करून द्यावीत.	राज्यात एम.आय.डी.सी मार्फत त्यांचे प्रचलित धोरणानुसार उद्योग उभारण्यासाठी पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. तसेच अन्न प्रक्रिया उद्योगांना उद्योग उभारतांना लागणारी यंत्रसामुग्री स्वतः अर्थसहाय्य उपलब्ध करून उभारणी करावी लागते.

समितीच्या दिनांक ३ ऑक्टोबर २०१७ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, सदरील बाबींसाठी केंद्र शासनाची जी योजना २०१५-२०१६ पर्यंत चालू होती. ती योजना केंद्र शासनाने २७ मार्च २०१५ च्या पत्रान्वये बंद केलेली आहे. त्यानंतर मा. वित्त मंत्री यांनी सन २०१६-१७ च्या अधिवेशनांमध्ये सदरील बाबींसाठी राज्य सरकारची स्वतःची योजना सुरू करण्यात येईल अशी घोषणा केलेली आहे. याबाबींचा विचार करून राज्य सरकारने २० जून २०१७ मुख्यमंत्री, कृषी व अन्न प्रक्रिया योजना राज्यात लागू केलेली आहे. या योजनेमध्ये चार प्रमुख बाबी समाविष्ट असून त्याम्हणजे अन्न प्रक्रिया, शीतसाखळी वगैर यासारख्या उद्योगांना प्रोत्साहन देणे आणि दुसरी बाब म्हणजे मागील योजना चालू असताना ज्या लोकांना अर्धवट अनुदान देण्यात आलेले आहे त्यांना उर्वरीत अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तिसरी बाब अशी की, ज्या संस्था सदरील योजनेचे प्रशिक्षण देण्याचे काम करतात त्यांना पुढील प्रशिक्षण किंवा पायाभूत माहिती दिली यासाठी जो खर्च येईल त्याच्या ५०% रक्कम त्यांना प्रतिपुर्ती म्हणून देण्यात येणार आहे. असे या योजनेतील प्रमुख बाबी आहे. जे नाशवंत फळे आणि भाजीपाला आहेत ज्यांच्यावर तातडीने प्रक्रिया करण्याची गरज आहे त्यासाठी ही योजना आहे आणि या योजनेसाठी प्रत्येक उद्योगाला त्यांची योजना पाहून त्यांच्या एकूण गुंतवणुकीच्या ३०% किंवा ५० लाखापर्यंतची सबसिडी राज्य शासनातर्फे देण्यात येणार आहे. एका प्रकल्पास जास्तीत जास्त ५० लाखापर्यंत सबसिडी मिळणार असून त्या रकमेच्या अडीचपट त्या प्रकल्पाची गुंतवणूक असणे आवश्यक आहे. म्हणजेच जवळपास दिड कोटी रूपयाच्या गुंतवणुकीवर ५० लाख रूपयांची सबसिडी दिली जाते किंवा संबंधित प्रकल्पासाठी करण्यात आलेल्या खर्चाच्या ३० टक्के रक्कम सबसिडी म्हणून देण्यात येते. आतापर्यंत सदरील योजनेसाठी १७ प्रस्ताव आयुक्त कार्यालयाकडे आलेले आहे. या योजनेला प्रसिद्धी देऊन आणखी लोकांकडून प्रस्ताव मागविण्यात येणार आहे. सदरील प्रस्ताव वैयक्तिक स्वरूपात, कंपनीमार्फत आणि सहकारी संस्थामार्फत येणार आहे. सदरील योजना अंमलात आल्यानंतर या विभागाची अन्न प्रक्रिया धोरण निश्चित करण्याचे प्रस्तावित आहे. अन्न प्रकिया विभाग अशा प्रकारचा विभाग आपल्या सचिवालयात असावा असे मा. मुख्यमंत्र्यानी आदेश दिले होते पण विभागाच्या कामाचा व्याप विचारात घेता असे ठरविण्यात आले की, सदरील कामासाठी दोन स्वतंत्र संचालनालय निर्माण करावयाचे आहेत. त्यातील कृषी आयुक्तालयामध्ये एक संचालनालय असेल त्यामध्ये वैयक्तिक प्रकल्प आणि त्या प्रकल्पांना जी काही मदत लागेल ती संचालनालयातर्फे दिली जाईल तसेच दुसरे संचालनालय उद्योग संचालनालयात स्थापन करण्यात येणार आहे. मेगा फुड पार्क व फुड पार्क याबाबतची जी प्रकरणे आहेत ती या संचालनालयामार्फत हाताळली जाणार आहेत.

सन २००७ आणि २०१३ च्या शासन धोरणानुसार उद्योग विभागाच्यामार्फत कृषी प्रक्रिया प्रकल्प योजनेस उत्तेजन देण्यासाठी प्रोत्साहन योजना सुरू केली आहे. कृषी प्रक्रिया प्रकल्पामध्ये एकूण ४५६ छोटे छोटे प्रकल्प आहेत. सन २००७ मध्ये आतापर्यंत १९२ कोटी रूपये प्रोत्साहन निधी दिला आहे. याकरिता उद्योग आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र कक्ष असेल व त्यांच्यामार्फत फक्त कृषी प्रक्रिया उद्योगाचा कारभार पाहिला जाईल आणि कृषी आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली असाच एक स्वतंत्र कक्ष असेल आणि जिल्हा पातळीवरील जे काही प्रस्ताव असतील ते त्यांच्याकडे थेट दाखल होतील. उद्योग विकास आयुक्त सदरील प्रस्ताव तपासुन एक खिडकी योजनेप्रमाणे त्यांचा निपटारा करण्याचे नवीन धोरण प्रस्तावित आहे. या प्रकल्पात महत्त्वाच्या ज्या उणीवा आहे त्या म्हणजे कोल्ड चेन्स, स्टोअरेजेस या बाबींचा अंतर्भाव नवीन धोरणात करण्यात आला आहे. आपल्याकडे सातारा, पैठण आणि वर्धा या तीन ठिकाणी केंद्र सरकारचे फुड पार्क प्रस्तावित आहे व त्यांना मेगा फुड पार्क म्हणून मंजूरी मिळाली आहे. याच धरतीवरती राज्य शासनाच्या स्वतःच्या निधीमधून असे फुड पार्क उभारण्याचे धोरणही येणा-या नवीन धोरणामध्ये अंतर्भूत आहे. सदरील धोरण जवळपास एक महिन्यापर्यंत मंत्रीमंडळासमोर येऊन मंजूर होईल.

सदरील धोरणांमध्ये बाजार समितीवर दोन विशेष निमंत्रित सदस्य कृषी प्रक्रिया, कृषी पणन कायदा अर्थशास्त्र किंवा वाणिज्य या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संदर्भातील कायद्यानुसार असतील. कृषी उत्पन्न बाजार समितीवर निवडून येणा-या सदस्य व्यतिरिक्त दोन सदस्य डायरेक्टर असावेत असा वेगळा कायदा आहे. रिसर्च सेंटर मार्केटींग इन्फ्रास्ट्रक्चर जिल्हा समितीचा यामध्ये यापूर्वीच समावेश आहे. या समितीमध्ये लोकप्रतिनीधी या विषयातील तज्ज्ञ, एनजीओ यांचे प्रतिनीधी यांचा समावेश करण्याबाबत आजच्या बैठकीचा संदर्भ देऊन कृषी सचिवांसमवेत चर्चा केली जाईल. शासनाकडे संपूर्ण राज्यासाठी औरंगाबाद येथे औद्योगिक विभागाचे स्वतःचे एक उद्योजकता प्रशिक्षण केंद्र आहे. त्यामधील तज्ज्ञांचे सहाय्य घेऊन त्यांना मोबदला देता येईल. मनुष्य विकास किंवा प्रशिक्षण विभाग आहे त्यास केंद्र शासनाकडून अनुदान मिळत होते तेव्हा या विभागास नियमित अनुदान मिळत असत. दिनांक २० जून २०१७ च्या शासन निर्णयानुसार केंद्राकडून मिळणारी अनुदाने केंद्र सरकारच्याच संस्थाना देण्याची व्यवस्था केलेली आहे. केंद्र शासनाकडून अनुदाने होती तेव्हा ती आम्हाला मिळत होती पण महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयात मात्र केंद्र शासनाच्या सी.एफ.टी.आर.आय. व विद्यापीठे यांचाच उल्लेख केला आहे. सी.एफ.टी.आर.आय. ची मुंबई येथे युनीट आहे परंतु तेथे प्रशिक्षण देण्यासाठी फक्त दोनच प्रशिक्षक आहे. तरीसुध्दा महाराष्ट्र शासनाने त्यांना मंजुरी दिलेली आहे. विद्यापीठाचे कर्मचारी सुद्धा विद्यापीठाच्या बाहेर जाऊन प्रशिक्षण देत नाही. त्यामुळे राज्य शासनाने काढलेल्या शासन निर्णयामुळे फक्त केंद्र शासनाच्या संस्थाची व्यवस्था केली आहे. अन्न प्रक्रिया योजनेसाठी

सबसीडीच्या योजना पणन विभागाकडे जास्त आहे. अन्न प्रक्रियेसाठी पणन विभागाकडे कृषी प्रक्रिया संबंधित फक्त एकच योजना आहे. यामध्ये ५ कोटीचा प्रकल्प असेल तर त्यातील ६०% कर्जावर एन.सी.डी.सी.च्या हमी देतात यासाठी राज्य शासनाचे भागभांडवल ३६ टक्के आहे. आणि ४ टक्के संस्थेचे भागभांडवल आहे. फक्त ही एकच योजना पणन विभागामार्फत राबविण्यात येते. वस्त्रोद्योग योजना तसेच फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग या दोन्ही योजना वेगवेगळया आहेत. या योजनेमध्ये भागभांडवलावर ६ ते ७ टक्के व्याज आकारले जाते. मागील वर्षासाठी एकूण ४ कोटीची तरतूद करण्यात आली होती. यावर्षासाठी एकूण १२ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. शासनाकडून सदर योजनेच्या निधीवर पुरेशा प्रमाणात भागभांडवल देऊ शकत नसेल तर सदर योजनेच्या निधीवर २० ते ३० टक्केची सबसीडी देऊन या योजनेची अंमलबजावणी करावी.

यावर समितीने विचारणा केली की, महाराष्ट्रामध्ये फळे-भाजीपाला आणि प्रक्रिया यावरील उद्योग आणि या उद्योगांची राज्यातील सद्यःस्थिती यामध्ये फार मोठ्या प्रमाणात तफावत आहे. अलिकडच्या काळामध्ये ज्या शेतक-यांच्या आत्महत्या होत आहे किंवा अनेक शेतक-यांना त्यांच्या मालाची किमंत मिळत नाही, माल बाजारात येत नाही त्यामुळे माल सडून नष्ट होणे याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. फळे-भाजीपाल्यावर प्रक्रिया करणारे उद्योग वाढविण्याकरिता शासनाने काही योजना सुचविल्या पाहिजे व त्यावर विधीमंडळात चर्चा सुद्धा झाली आहे. दुसरी बाब म्हणजे शासनाकडे यासंदर्भात प्रशिक्षणासाठी किंवा इतर बाबींसाठी विशिष्ट असे धोरण नाही मोघम स्वरूपात काही सवलती या उद्योगाला दिलेल्या दिसतात. सवलतीचा लाभ शेतकरी वर्गापर्यंत पोहचत नाही. शेतक-यांना यातील नियम कळत नसल्यामुळे एनजीओ नावाने संस्था स्थापन केली आहे. यासाठी सामुहिक प्रोत्साहन देणे आवश्यक असून त्यामध्ये विद्युत शुल्क माफी, विद्युत दरामध्ये अनुदान, सहकारी संस्थाची नावे शेतक-यांना कळणे आवश्यक आहे. आतापर्यंत ११७ सहकारी संस्थांपैकी फक्त ६ ते ७ संस्था कार्यरत असून २ संस्थांनी कर्जाची परत फेड केली आहे. उर्वरित संस्था शासनाकडून मिळालेल्या अनुदानाचा उपयोग फळे व भाजीपाला प्रक्रियेवर खर्च करीत नसल्याचे आढळून आले आहे. केंद्र शासनाकडून सर्व प्रकारची उपकरणे मिळत होती परंतु महाराष्ट्र शासनाकडे योजना सोपविण्यात आल्यापासून शासनातर्फे सदर योजनेचा लाभ बंद झाला आहे. सदरील योजनेसाठी सबसीडी मिळण्याची गरज शेतक-यांना आहे. फलोत्पादन प्रक्रियेवर वैयक्तिक खर्चावर लागवड केली जाते. रोजगार हमी योजनेमार्फत कार्यक्रम राबविला जाताना राज्यात मोठ्या प्रमाणात फलोत्पादनास सुरूवात झाली आहे. फळबागा जिवंत राहण्यासाठी वेगवेगळया बागांमध्ये ती वेगवेगळी असल्याचे दिसते. यामध्ये फलोत्पादन लागवड व रोजगार हमी योजना यांचा ताळमेळ असलेला दिसून येत नाही. फलोत्पादन लागवड यावर प्रक्रिया करणारे कारखाने उभारण्यासाठी विभागामार्फत योग्य ते प्रयत्न करण्याचे दिसून येत

नाही. केंद्र सरकारच्या सचिवालयात अन्न प्रक्रिया विभाग आहे त्याप्रमाणे राज्य सरकारच्या सचिवालयात असा विभाग असणे अत्यंत गरजेचे आहे कारण महाराष्ट्रात एकूण क्षेत्रफळाच्या ७०% भागात कृषी किंवा शेती काम करण्यात येते. यामध्ये होतकरू लोकांना वेगवेगळया भागात प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिकोनातून कोणत्या भागात कोणत्या कृषी उत्पादनावर कोणते उद्योग उभारता येऊ शकतात याबाबत संशोधन किंवा विकास करणे गरजेचे आहे. राज्यात लहान बोरापासून ते इतर सर्व फळांपर्यंत आपण कशा पद्धतीने उत्पादन करू शकतो तसेच स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्याकरिता विविध प्रकारच्या योजना अंमलात आणाव्या लागतील. फळांवर प्रक्रिया करण्यासाठी लोकांचे अर्ज फळे-भाजीपाला प्रक्रिया महासंघ पुणे येथे येत नाहीत. हि संस्था फळांवर प्रक्रिया करण्यासाठी प्रोत्साहन देत आहे. कर्नाटक व गुजरात राज्याचे दूध मुंबईत येते त्यामुळे महाराष्ट्रातील दुधाचा खप होत नाही यासाठी शासनाने वेळेत निर्णय घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सरकारच्या कृषी उद्योग पणन याविभागाने समन्वय साधून मार्केटिंग मशीनरी व कृषी उत्पादन यांची एकत्रित समिती करून शासनाचा हा प्रकल्प यशस्वी केला पाहिजे.

समितीला दिनांक ११ जून २०१८ रोजीच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग (पणन) विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट दोन-क) मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

मुद्दा क्र.	मुद्दा	माहिती
९	**महाराष्ट्र शासन राजपत्र** मंगळवार, दिनांक १६ जून २०१५ ला उल्लेख केल्या प्रमाणे प्रत्येक बाजार समित्यांवर अन्न प्रक्रिया संघाच्या तज्ज्ञाची नियुक्ती व्हावी. प्रत्येक बाजार समितींनी अन्न प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण सुरू करावे.	महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र** दिनांक १६ जून २०१५ अध्यादेश काढण्यात आलेला आहे. त्यामध्ये (एक) ज्या बाजार समितीचे मागील लगतच्या बाजार वर्षात कलम ३१ च्या पोट कलम (१) अन्वये बसविलेल्या व गोळा केलेल्या फी पासून मिळणारे उत्पन्न हे, पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल अशा प्रत्येक बाजार समितीवर चार विशेष निमंत्रित नियुक्त करता येतील, आणि (२) ज्या बाजार समितीचे मागील लगतच्या बाजार वर्षात कलम ३१ च्या पोट कलम (१) अन्वये बसविलेल्या व गोळा केलेल्या फी पासून मिळणारे उत्पन्न हे पाच कोटी रुपयांपर्यंत असेल. अशा प्रत्येक बाजार समितीवर दोन विशेष निमंत्रित नियुक्त करता येतील अशी तरतुद आहे.

ज्या कृषि, कृषि प्रक्रिया, कृषि पणन, कायदा, अर्थशास्त्र किंवा वाणिज्य या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती असतील.

समितीच्या दिनांक ११ जून २०१८ रोजीच्या झालेल्या साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, अन्न प्रक्रिया उद्योगात ही कामे राज्यात दोन विभाग सांभाळतात. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये जमिनीचा विकास, रस्ते, गटार, पाण्याचा निचरा, स्वच्छ पाणीपुरवठा, विद्युत सबस्टेशन उभारणे इत्यादी कामे करते. केंद्र शासन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळावर आधारित न राहता राज्यात केंद्राने सात फूड पार्क निर्माण करण्यात आले आहे. औरंगाबाद येथे लक्ष्मी निर्मल प्रतिष्ठान, नागपूर येथे हल्दीराम कृषी उद्योग प्रा. लि. व मॉ उनिया औद्योगिक सहकारी वसाहत, बुटी बोरी येथे महाराष्ट्र कृषी विकास महामंडळाने ऑरेंज सिटी फूड पार्क आणि नाशिक येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने फूड पार्क तयार केले. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पलूस-सांगली येथे फूड पार्क तयार केला आहे आणि ॲग्री फूड इन्फॉमेट्रिक्स यास खाजगी संस्थानी सातारा येथे फूड पार्क तयार केले. एकाच ठिकाणी ५०-१०० युनीट असतील तर विपणनासाठी म्हणूनच महाराष्ट्रात तीन मेगा फूड पार्क मंजूर केले आहे. सातारा येथे बीव्हीजी ग्रुप यांनी मेगा फूड पार्क तयार केलेला आहे तसेच पैठण येथे कागलीवार ग्रुपने फूड पार्क तयार केलेला आहे आणि वर्धा येथे सुध्दा खाजगी मेगा फूड पार्क तयार करण्यात आले आहे. शासन त्याकरिता ५० कोटी रुपयाचे अनुदान देते खाजगी लोकांना सांगितले जाते की शासकीय ब्युरोक्रेटिक ॲप्रोचमुळे पाहिजे तसे डेव्हलोप होत नसल्यामुळे खाजगी लोकांना अनुदान देवून त्यांनी ते डेव्हलप करावे जेणेकरून ते उद्योजकांची गरज समजून घेतील त्या पद्धतीने मेगा फूड पार्कची योजना आणण्यात आली. दुस-या टप्प्यावरती राज्यात तीन ठिकाणी मेगा फूड पार्क करण्यात आलेले आहेत. यामध्ये उद्योजकांना छोटे प्लॉट देण्याचा उद्देश आहे. उद्योजकांनी फ्रोजन फळे आणि भाज्यांच्या निर्यातीचे काम सुरू केले आहे. वर्धा येथे बरेच उद्योग आले असून अद्याप पैठण व सातारा येथे उद्योग यायचे आहे. अन्न प्रक्रिया किंवा फळ प्रक्रिया नवीन नसल्यामुळे बरेच क्लष्टर पूर्वी पासून असून कोकण व पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूरच्या आजरा, चंदगड भागात पूर्वीपासून काजू प्रक्रिया व मँगो पल्पचे प्रक्रिया उद्योग आहेत. आंबा निर्यातीसाठी रिसर्च फायंडिग असा होता की, फ्रुट फ्लाय आणि व्हाईट टिशुचा प्रश्न येतो. फ्रुट फ्लायचे निदान म्हणून दोन प्रकारची टेक्नालॉजी आहे. अमेरीका किंवा युरोप मध्ये आंबा पाठविताना रेडीयेशन केले तर त्यांना चालते आणि जपानला हॉट वॉटर ट्रिटमेंट चालते ते रेडीयेशनकरिता परवानगी देत नाही. भारत

सरकारने लासलगाव येथे कांद्यासाठी दोन प्रकारची सुविधा निर्माण केली होती. परंतु आर्थिक दृष्ट्या ते परवडत नाही. महाराष्ट्र पणन विभागाने पणन महामंडळाच्या मार्फत वाशी मार्केटमध्ये या दोन्ही सुविधा निर्माण केल्या आहेत. कारण तेथून आंब्याची निर्यात होत असल्यामुळे तेथे आंब्यावर पॅकींग करण्यापूर्वीच प्रक्रिया करावी लागते मग ती हॉट वॉटर ट्रिटमेंट असो की रेडीयेशन ट्रिटमेंट असो. आंबा तेथूनच हवाई मार्गाने निर्यातीसाठी पाठविला जात असल्यामुळे ती जागा योग्य आहे. केंद्र शासनाने त्यांना स्ट्रेन्थ मिळावा यासाठी नॅशनल मिशन फॉर फूड प्रोसेसिंग योजना सुरू केली व १४ व्या वित्त आयोगापासून ती योजना डिकन्टीन्यू केली. सध्या जी योजना लागू केली आहे त्यामध्ये कंपोनन्ट आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, अन्न प्रक्रिया उद्योग यास गेल्या वीस वर्षांपासून प्रशिक्षणसाठी केंद्र शासनाकडून अनुदान मिळत होते मात्र सन २०१४ पासून केंद्र शासनाने हे प्रशिक्षणाचे अनुदान राज्य शासनाकडे वर्ग केले आहे. तेव्हा पासून अन्न प्रक्रिया करणा-यांची अनुदाने पूर्णपणे बंद झालेली आहेत. राज्याने हे अनुदान आता प्रशिक्षणाच्या केंद्रीय संस्थांना दिलेले आहे. केंद्रीय संस्थाकडे प्रशिक्षणाची भरपूर तरतूद असते. मात्र त्या संस्था सामान्य वर्गापर्यंत जाऊ शकत नाही. देशात ६० वर्षानंतरही प्रक्रिया ही ३ ते ४ टक्क्यांच्या पुढे गेली नाही. पश्चिमात्य देशात ती जवळपास १०० टक्के आहे. कुठल्याही उत्पादित मालावर प्रक्रिया केल्यानंतर त्याची किमंत ७ ते ८ पट वाढते. अजुनही आपण पहातो की, शेतकरी शेतमाल रस्त्यावरती फेकून देतात. मुख्यमंत्री अन्न प्रक्रिया योजनेमध्ये शासनाचे ३० टक्के व लाभार्थ्यांचे ७० टक्के बँकेत जमा करावयाचे. बँकेत जमा केल्यानंतरच उद्योग सुरू करता येतात. त्यामुळे सामान्य शेतक-याला कुठलीही बँक उद्योग सुरू करावयाला मदत करीत नाही. मुख्यमंत्री अन्न प्रक्रिया बाबतच्या शासन निर्णयामध्ये ज्या अटी घातल्या आहे त्या अटी दुस-या कुठल्याही शासकीय निर्णयामध्ये नाहीत. त्या शासन निर्णयातल्या अटी कमी कराव्यात. शेतामध्ये अन्न प्रक्रिया युनिट सुरू केले तर शेतीप्रमाणेच दिवसा ८ व रात्री ८ अशी विज मिळते आणि त्याचे दर कारखान्याप्रमाणे द्यावे लागतात. अन्न प्रक्रिया उद्योगासाठी वीज ही शेतीप्रमाणे दिली जाते दर मात्र कमर्शियल दराने आकारल्या जातात.

अभिप्राय व शिफारशी :—

''राज्यात अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता असणेबाबत'' या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य ॲड रामहरी रूपनवर, वि.प.स. यांनी दिनांक ५ एप्रिल २०१७ रोजी दिली व दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी प्रस्तुतचा विनंती अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषद सभागृहास सादर केला.

विनंती अर्जदारांनी आपल्या अर्जात नमूद केले आहे की, राज्यात अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता आहे. यामुळे शेती मालाला योग्य भाव

मिळतील. ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होईल व परेदशी चलन मोठ्या प्रमाणावर मिळू शकेल. अलिकडील काळामध्ये ज्या शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत किंवा अनेक शेतक-यांना त्यांच्या मालांची योग्य किंमत मिळत नाही किंवा वेळेत तो माल बाजारात येत नाही म्हणून तो सडून नष्ट होतो याचे प्रमाण मोठे आहे आणि यासाठी फळे व भाजीपाल्यावर प्रक्रिया करणारे उद्योग वाढले पाहिजेत यासाठी शासनाने प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे.

विनंती अर्जदारांनी आपल्या विंनती अर्जात पुढीलप्रमाणे मागण्या केलेल्या आहेत-(१) दिनांक ५ जानेवारी २०१३ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा स्तरावर अन्न प्रक्रिया अभियान समिती गठीत करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र या निर्णयाची अंमल बजावणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे अन्न प्रक्रिया, अभियान कागदावरच राहिले आहे. (२) अन्न प्रक्रिया, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग विकासासाठी स्वतंत्र विभाग सुरू करण्यात यावा. (३) प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात यावे. तालुका स्तरावर प्रशिक्षण देण्यासाठी फिरते प्रक्रिया व केंद्र स्थापन करावीत व यासाठी शासनाने मदत करावी. (४) फळे आणि भाजीपाला प्रक्रिया महासंघास शासनाची मान्यता मिळावी. या संघाला राज्य शासनाने पुणे येथे प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यासाठी जागा व तरतूद उपलब्ध करून द्यावीत. (५) अन्न प्रक्रिया उद्योगाला डी + झोनच्या सुविधा देण्यात याव्यात. (६) प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी १०० टक्के स्टँप ड्युटी माफ असावी. या उद्योगाला कृषीचा भाग म्हणून कृषीच्या दरानुसार विद्युत पुरवठा मिळावा. या उद्योगासाठी लागणारे पाणी शेतीच्या धर्तीवर मिळावे. प्रक्रिया उद्योगाला व्हॅट मधून सूट मिळावी. (७) प्रक्रिया उद्योगासाठी एक खिडकी योजना सुरू करावी व सर्व परवाने एकत्र मिळण्याची व्यवस्था व्हावी. भरड धान्य योजना प्रक्रिया उद्योगाप्रमाणे फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योगासाठी लागणारी मशनरी, तज्ज्ञ मार्गदर्शन, खेळते भांडवल, प्रशिक्षण, विक्री व्यवस्था इत्यादींची सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. (८) अन्न प्रक्रिया उद्योगासाठी एम.आय.डी.सी. मध्ये तयार जागा व यंत्र सामग्री उपलब्ध करून द्यावी. (९) **महाराष्ट्र शासन राजपत्र,** मंगळवार, दिनांक १६ जून २०१५ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे प्रत्येक बाजार समित्यांवर अन्न प्रक्रिया संघाच्या तज्ज्ञांची नियुक्ती व्हावी. प्रत्येक बाजार समितीने अन्न प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण सुरू करावे. (१०) अन्न प्रक्रिया उद्योग विकासासाठी केंद्र शासनाच्या फूड पार्क, कोल्ड चेन, क्लस्टर गोडाउन विकसन, तंत्रज्ञान विकसन, संशोधन विकास पॅकिंग तंत्रज्ञान, विकीरण विकसन, एकात्मिक शितगृह, मूल्य संवर्धन प्रयोगशाळा, इरीगेशन सुविधा इत्यादी पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाची अनुदाने आहेत त्यांचा उपयोग करण्यासाठी स्वंय सेवी संस्थाच्या मदतीने अंमलबजावणी करण्यात यावी केंद्र शासनाचा निधी राज्यातील अन्न प्रक्रिया उद्योगाला मिळण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी. यासाठी अन्न प्रक्रिया महासंघाला सहकार्य करावे. (११) अन्न प्रक्रिया उद्योग विकासावर चर्चा करण्यासाठी मा. मुख्यमंत्री,

मा. कृषीमंत्री, मा. पणन मंत्री व मा. उद्योग मंत्री यांनी प्रत्येक तीन महिन्यातून एकदा चर्चेसाठी वेळ उपलब्ध करून द्यावी. या प्रक्रिया महासंघाच्या पदाधिकारी, प्रक्रिया तज्ज्ञ, अन्न प्रक्रिया उद्योजक यांना या बैठकीसाठी आमंत्रित करण्यात यावे.

विंनती अर्जदारांनी आपल्या विनंती अर्जात उपस्थित केलेला पहिला व महत्वाच्या मुद्दा म्हणजे दिनांक ५ जानेवारी २०१३ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा स्तरावर अन्न प्रक्रिया अभियान समिती गठीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तथापि, या निर्णयांची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे अन्न प्रक्रिया अभियान कागदावरच राहिले आहे. याबाबत कृषि विभागाने दिलेल्या माहितीत नमूद केले आहे की, केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न प्रक्रिया अभियान ही योजना सन २०१५-१६ या आर्थिक वर्षापासून बंद केलेली असून सदर योजना राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात चालू ठेवावी किंवा कसे याबाबत निर्णय घेण्याचे केंद्र शासनाने कळविले होते. त्यानुसार राज्याच्या अर्थसहाय्यातून राबविण्यात येणारी कृषि व अन्न प्रक्रिया योजना ही नवीन योजना राज्यात राबविण्याबाबतच्या धोरणात्मक निर्णयाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. दिनांक ३० मे २०१७ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना राज्यात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून दिनांक २० जून २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवीन योजना राज्यात सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तथापि, मुख्यमंत्री अन्न प्रक्रिया उद्योगाबाबतच्या शासन निर्णयामध्ये अनेक जाचक अटी आहेत. दुस-या कुठल्याही उद्योगासाठी नसतील एवढ्या अटी या शासन निर्णयामध्ये आहेत. सदर योजनेतील एक अट अशी आहे की, शासनाचे ३० टक्के व लाभार्थ्यांचे ७० टक्के त्यांनी बँकेमध्ये जमा करायचे आणि बँकेची परवानगी मिळाल्यानंतर त्यांनी उद्योग सुरू करायचा अशा प्रकारे बँकेस लिंक करण्यात आलेले आहे. सामान्य शेतक-यांला कुठलीही बँक उभे करीत नाही हे दुर्देव आहे. त्यामुळेच अन्न प्रक्रिया उद्योग हे महाराष्ट्रात विकसीत होऊ शकत नाहीत. जे काही उद्योग सुरू केलेले आहेत, ते वेगवेगळ्या खाजगी लोकांनी सुरू केलेले आहेत. त्यामुळे सामान्य शेतक-याला, सामान्य उद्योजकाला किंवा शेतक-याच्या मुलाला आपल्या शेतात अन्न प्रक्रिया उद्योग सुरू करणे अवघड जात आहे. त्यामुळे ज्या अटी जाचक आहेत त्या कमी करणे आवश्यक असल्याचे समितीचे मत आहे.

अन्न प्रक्रियेबाबतच्या ज्या योजना आहेत, त्या योजनांची माहिती देणारी शासनाची कोणतीही यंत्रणा नाही. केंद्र शासनामध्ये यासाठी स्वतंत्र विभाग आहे. तथापि, राज्यामध्ये तशी सोय नाही. अन्न प्रक्रिया उद्योगासाठी प्रपोजल तयार करणे, योजना तयार करणे, योजनांची माहिती देणे यासाठी स्वतंत्र यंत्रणा जर प्रत्येक जिल्ह्याला उपलब्ध करून दिली तर जास्त सोईचे होईल. अनेकदा शेतक-यांना आपला भाजीपाला रस्त्यावर फेकावा लागतो ही फार गंभीर बाब आहे. अन्न प्रक्रिया अभियान आपण जर जिल्हा, तालुका व ग्राम पातळीवर आयोजित केले तर

संबंधित शेतक-यांना याबाबत चांगली माहिती मिळेल व ते देखील या माध्यमातून अन्न प्रक्रिया प्रकल्प आपल्या शेतामध्ये राबवू शकतील **त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात यावे व तालुका स्तरावर प्रशिक्षण देण्यासाठी फिरते प्रक्रिया केंद्र लवकरात लवकर स्थापन करण्याची कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

फळे आणि भाजीपाला प्रक्रिया महासंघ, महाराष्ट्र राज्य या सारख्या संस्था या प्रक्रिया क्षेत्रामध्ये २० ते २५ वर्षे काम करीत आहेत. गेल्या २० ते २५ वर्षात त्यांनी प्रामुख्याने प्रशिक्षण देण्याचे काम केले आहे. २० वर्षापासून त्याना प्रशिक्षणासाठी केंद्र शासनाकडून अनुदान मिळत होते मात्र सन २०१४ पासून केंद्र शासनाने हे प्रशिक्षणाचे अनुदान राज्य शासनाकडे वर्ग केलेले आहे. तेव्हा पासून सदर अनुदाने पूर्ण बंद झाली आहेत. राज्य शासनाने हे अनुदान आता प्रशिक्षणाच्या केंद्रिय संस्थाना दिलेले आहे. खरे म्हणजे केंद्रिय संस्थाकडे प्रशिक्षणाची भरपूर तरतूद असते. तथापि, या संस्था तळागळातल्या वर्गापर्यंत जाऊ शकत नाहीत. अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रिया काय आहे याबाबतचे जागृती कार्यक्रम घेतले पाहिजेत. आपल्या देशात अन्न प्रक्रिया ३ ते ४ टक्याच्या पुढे गेलेली नाही. मात्र पाश्चिमात्य देशात हेच प्रमाण जवळ जवळ १०० टक्क्यापर्यंत गेलेले आहे. त्यामुळे प्रथमतः लोकांमध्ये याबाबत जागृती करणे गरजेचे आहे. शेतीच्या उत्पादीत मालावर प्रक्रिया केल्यानंतर त्यांची किंमत वाढते व ते शेतक-यांच्या फायद्याचे आहे. आपण अजूनही पाहतो की, शेतकरी दरवर्षी रस्त्यावर कांदे, टोमॅटो, भाजीपाला फेकून देतात. तथापि, त्यावर प्रक्रिया करण्याबाबत त्यांना कोणीही सांगत नाही किंवा शिकवत नाही. केंद्र शासनाने संपूर्ण देशामध्ये मोठ्या प्रमाणावर अन्न प्रक्रिया अभियान राबविले. आपल्याकडेही ती तरतूद झाली होती. तथापि, ही तरतूद खाली जिल्हा स्तरावर कोठेही पोहोचलेली नाही. हे दुर्देवाने नमूद करावेसे वाटते. अन्न प्रक्रिया अभियान तळागाळापर्यंत राबवायला पाहिजे ज्यामुळे शेती मालाला चांगला भाव मिळू शकेल. शेतक-यांच्या आत्महत्या कमी करण्यासाठी त्याचा निश्चितपणे उपयोग होईल.

फळे व भाजीपाला यावर प्रक्रिया करणे आता अत्यावश्यक झाले आहे. त्यामुळे शेतक-यांना त्यांच्या मालाचा योग्य भाव मिळू शकेल. या बाबींचा विचार करून फळे, भाजीपाला प्रक्रिया महासंघाची स्थापना सुमारे २० वर्षांपूर्वी पुणे येथे करण्यात आली आहे. लोकांना फळांवर प्रक्रिया करण्यासाठी प्रोत्साहन देणे, छोटे छोटे उद्योग सुरू करणे तसेच फळे व भाजीपाला यावर प्रक्रिया करण्याचे प्रशिक्षण देणे इत्यादी कामे सदर महासंघातर्फे केली जातात. त्यांच्याकडे १०० हून अधिक प्रशिक्षक आहेत. सामाजिक कार्य म्हणून ते प्रक्रिया उद्योगाचे प्रशिक्षण जागेवर जाऊन देतात. अनेक प्रकारच्या उद्योगांचे प्रशिक्षण देण्याचे काम ही संस्था करते. त्यांच्याकडे सर्व प्रकारचे प्रशिक्षक आहेत. त्यांच्याकडे प्रशिक्षक, मशिनरी व मार्केटिंगचे लोक आहेत. या

महासंघाचे लोक सर्व प्रकारच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. या पूर्वी केंद्र सरकारच्या योजनेमधून महासंघाकडून शेतक-यांसाठी वेगवेगळे कार्यक्रम करण्यात येत होते. आता केंद्र सरकारची योजना बंद झाली असून संबंधिताना मिळणारे अनुदान बंद झाले आहे, त्यानंतर राज्य शासनाने अशी कोणत्याही प्रकारची योजना सुरू केलेली नाही. **लहानात लहान शेतक-यांपर्यंत पोहोचण्यासाठी यंत्रणा तयार करणे आवश्यक आहे. सदर यंत्रणा तयार करण्यासाठी फळे, भाजीपाला प्रक्रिया महासंघ तसेच यासारख्या अनुभवी संस्था व नोंदणीकृत एन.जी.ओ.ना मान्यता देवून अथवा तत्सम यंत्रणांची उभारणी करून आरोग्य शिबीरे घेणे व त्यांना प्रवास भत्ता तसेच अनुदान देण्याबाबत योग्य ती कारवाई करण्यात यावी तसेच सदर यंत्रणातर्फे सदर कार्यक्रम राबविण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

सुरूवातीला फळे व भाजीपाला महासंघ अन्न प्रक्रियेबाबत प्रशिक्षण देण्याची कामे मोठ्या प्रमाणावर करीत होता. त्यासाठी केंद्र शासनाकडून निधी मिळत होता. हा निधी त्यानंतर राज्य शासनाकडे हस्तांतरीत झाल्यामुळे तो निधी मिळत नाही त्यामुळे प्रशिक्षण पूर्णतः बंद झाले आहे. सन २०१२ मध्ये अन्न प्रक्रिया अभियान सुरू झाले हे अभियान राबविण्यासाठी समिती स्थापन झाली होती. अन्न प्रक्रिया अभियानाच्या शासन निर्णयानुसार महासंघाच्या प्रतिनिधींचा त्यात समावेश केला होता. मुख्यमंत्री अन्न प्रक्रिया योजनेचाशासन निर्णय, दिनांक २० जून २०१७ रोजी काढण्यात आला आहे. तथापि त्यामध्ये फक्त अधिका-यांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये फळे व भाजीपाला प्रक्रिया महासंघाचे सदस्य नाहीत, बचत गटाचे सदस्य नाहीत, कोणत्याही लोक प्रतिनिधींचा समावेश नाही. यापूर्वी महिला बचत गटाचे सदस्य होते, अन्न प्रक्रिया महासंघाचे सदस्य होते. अशा ब-याच सदस्यांचा त्या समितीमध्ये समावेश होता.

या सर्व बांबीचा विचार केला असता अशा प्रकारच्या समित्या जिल्हा स्तरावर असायला हव्यात. तसेच कृषि विभाग, उद्योग विभाग व पणन विभाग यांचाही समावेश सदर समित्यात असणे आवश्यक आहे. **त्यामुळे समिती अशी शिफारस करते की, अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रिया याबाबत पणन विभागासह जिल्हाधिकारी स्तरावर अशी समिती लवकरात लवकर स्थापन करण्यात यावी व त्या समितीमध्ये लोक प्रतिनीधी, जिल्हा परिषद सदस्य, सभापती व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अन्न प्रक्रिया करणा-या संघाचे प्रतिनीधी, प्रशिक्षण देणारे तज्ञ प्रशिक्षक इत्यादींचा समावेश करण्यात यावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी.**

विनंती अर्जदारांनी आपल्या अर्जात उपस्थित केलेला दुसरा मुद्दा म्हणजे अन्न प्रक्रिया तसेच फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग विकासासाठी स्वतंत्र विभाग सुरू करण्याबाबतचा आहे. याबाबत कृषि विभागाने दिलेल्या माहितीत नमूद केले आहे की, अन्न प्रक्रिया, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग विकासासाठी विकास (उद्योग) यांचे अधिपत्याखाली कृषि प्रक्रियेकरिता स्वतंत्र विभाग निर्माण करण्यास माननीय मुख्यमंत्री महोदयांनी याबाबत अनुकुलता दर्शवली असून कृषि विभाग व उद्योग विभाग संयुक्तरित्या स्वतंत्र विभाग/यंत्रणा सुरू करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

अन्न प्रक्रिया तसेच फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग विकासासाठी स्वतंत्र विभाग सुरू करण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी अनुकूलता दर्शविली असल्याने समिती याबाबत समाधान व्यक्त करते. **तळागाळातील शेतक-यांना त्यांच्या शेतमालाला चांगला भाव मिळण्याच्या दृष्टिने अन्न प्रक्रिया तसेच फळे व भाजीपाला प्रक्रिया यासाठी लवकरात लवकर स्वतंत्र विभाग सुरू करण्याची कारवाई तात्काळ सुरू करावी तसेच अन्न फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योगातून निर्माण होणारे उत्पादन दर्जेदार व टिकाऊ होण्यासाठी प्रशिक्षण देण्यात यावे तसेच संशोधन करण्यात यावे व टेट्रा पॅक सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

विनंती अर्जदारांनी त्यांच्या अर्जात अनुक्रमांक ५ मध्ये मागणी केली आहे की, अन्न प्रक्रिया उद्योगाला डी + झोनच्या सुविधा देण्यात याव्यात तसेच अनुक्रमांक ६ मध्ये प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी १०० टक्के स्टॅम्प ड्युटी माफ असावी. या उद्योगाला कृषिचा भाग म्हणून कृषिच्या दरानुसार विद्युत पुरवठा मिळावा. या उद्योगासाठी लागणारे पाणी शेतीच्या धर्तीवर मिळावे तसेच प्रक्रिया उद्योगाला व्हॅट मधून सूट मिळावी. याबाबत उद्योग विभागाने दिलेल्या माहितीत नमूद केले आहे की, सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत राज्यामध्ये अ व ब वर्गीकरण तालुक्यांव्यतिरिक्त इतर ठिकाणी स्थापीत होणा-या सर्व प्रकारच्या नवीन/विस्तारीकरण प्रकल्पांना जमीन संपादनासाठी/जमिनीचा/गाळ्याचा भाडेपट्टा करार व भाडेपट्टा कराराचे हस्तांतरण तसेच दिर्घ मुदतीच्या कर्जाचे गहाण खत करण्यासाठी मुद्रांक शुल्क माफी अनुज्ञेय आहे. तसेच राज्यातील अन्न प्रक्रिया उद्योगांस विजदर संबंधित पाच घटकांना (१) विद्युत शुल्क माफी व (२) विद्युत दर अनुदान अनुज्ञेय आहेत. GST पात्र घटकांना GSTवर आधारीत औद्योगिक प्रोत्साहन अनुदान (IPS) अनुज्ञेय करण्यात आले आहे. याबाबत समिती समाधान व्यक्त करते.

शासनामार्फत उद्योगांना चालना देण्यासाठी नवीन औद्योगिक धोरण २०१३ नुसार सामुहिक प्रोत्साहन योजना राबविण्यात येते. दिनांक १ एप्रिल २०१३ च्या शासन निर्णयान्वये शासनाने सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंमलात आणली असून योजनेचा कालावधी १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१८ असा आहे. सदर योजनेनुसार राज्यात स्थापन होणा-या अन्न व कृषि प्रक्रिया उद्योगास इतर उद्योग घटकापेक्षा वाढीव १० टक्के अनुदान व अनुदान उपभोगण्याचा कालावधी एक वर्ष वाढवून देण्यात आलेला आहे. अन्न व कृषि प्रक्रिया उद्योगास इतर उद्योग घटकापेक्षा वाढीव १० टक्के अनुदान देण्यात आले आहे. ही समाधानाची बाब आहे. **तथापि, या उद्योगांची संख्या वाढवण्याच्या दृष्टिने व सदर उद्योग टिकून राहण्यासाठी या उद्योगांना कायम स्वरूपी अनुदान देण्याबाबतची कारवाई तात्काळ करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

विनंती अर्जातील अनुक्रमांक ७ व ८ मध्ये नमूद करण्यात आले आहे की, एक खिडकी योजना सुरू करावी व सर्व परवाने एकत्र मिळण्याची व्यवस्था व्हावी. भरड धान्य योजना प्रक्रिया उद्योगाप्रमाणे फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योगासाठी लागणारी मशनरी, तज्ञ मार्गदर्शन,

खेळते भांडवल, प्रशिक्षण, विक्री इत्यादीची सुविधा उपलब्ध करून द्यावी. अन्न प्रक्रिया उद्योगासाठी एम.आय.डी.सी. मध्ये तयार जागा व यंत्रसामुग्री उपलब्ध करून देण्यात यावी.

सदर मागण्यांबाबत उद्योग विभागाने दिलेल्या माहितीत नमूद केले आहे की, राज्यात एम. आय. डी. सी. मार्फत त्यांचे प्रचलित धोरणानुसार उद्योग उभारणीसाठी पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. तसेच अन्न प्रक्रिया उद्योगांना उद्योग उभारतांना लागणारी यंत्रसामुग्री स्वतः अर्थसहाय्य उपलब्ध करून उभारणी करावी लागते. **राज्यातील एम.आय.डी.सी. परिसरामध्ये फळे, भाजीपाला प्रक्रिया महासंघ यांना योग्य ती जागा राखून ठेवून सदर उद्योगासाठी वितरीत करण्याबाबत निर्णय घेण्यात यावा तसेच सर्व सोयीसुविधा देण्याबाबत मा. उद्योग मंत्री यांनी मान्य केलेले आहे. त्याप्रमाणे कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग लहानात लहान शेतक-यालाही करता यावा या दृष्टीकोनातून या उद्योगाला सहाय्य करण्याची नितांत आवश्यकता आहे. भारत हा शेतीप्रधान देश आहे. व यादेशात अल्पभूधारक शेतक-यांची संख्या जास्त आहे. या शेतक-यांना प्रक्रिया उद्योगामध्ये सहभागी होण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे तसेच त्यांना या उद्योगाबाबत सविस्तर माहिती देऊन जागृत करणे तितकेच महत्वाचे आहे. **त्यामुळे नवीन प्रक्रिया उद्योगासाठी शेतक-यांना सहाय्य व्हावे म्हणून या उद्योगासाठी लागणारे सर्व परवाने एकत्र मिळण्याची व्यवस्था व्हावी या दृष्टिकोणातून एक खिडकी योजना लवकरात लवकर सुरू करण्याची कारवाई तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १६ जून २०१५ च्या **राजपत्रात** उल्लेख केल्यानुसार प्रत्येक बाजार समितीने अन्न प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण सुरू करण्याबाबतचा मुद्दा अनुक्रमांक ९ वर विनंती अर्जात उपस्थित करण्यात आला आहे. तसेच मुद्दा क्रमांक १० मध्ये नमूद करण्यात आले आहे की, अन्न प्रक्रिया उद्योग विकासासाठी केंद्र शासनाच्या फुड पार्क, कोल्ड चेन, क्लस्टर, गोडाउन विकसन, तंत्रज्ञान विकास, संशोधन विकास, पॅकींग तंत्रज्ञान, विकीरण विकसन, एकात्मिक शितगृह, मूल्य संवर्धन प्रयोगशाळा, ईरीगेशन सुविधा इत्यादी पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाची अनुदाने आहेत. त्यांचा उपयोग करण्यासाठी स्वंयसेवी संस्थाच्या मदतीने अंमलबजावणी करण्यात यावी. ज्यामुळे अगदी लहान शेतक-यापर्यंतही पोहोचता येईल अतः केंद्र शासनाचा निधी राज्यातील अन्न प्रक्रिया उद्योगाला मिळण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे.

राज्य शासनाच्या दिनांक १६ जून २०१५ च्या अध्यादेशामध्ये नमूद केले आहे की, "ज्या बाजार समितीचे गोळा केलेल्या फी पासूनचे एक वर्षातील उत्पन्न हे रुपये ५ कोटी पेक्षा जास्त असल्यास त्या बाजार समितीवर चार विशेष निमंत्रित व ज्या बाजार समित्यांचे फी पासून मिळालेले उत्पन्न हे ५ कोटी रुपयांपर्यंत असेल त्या बाजार समितीवर दोन विशेष निमंत्रीत नियुक्त करता येतील व **या निमंत्रित व्यक्ती कृषि, कृषि प्रक्रिया, कृषि पणन, कायदा, अर्थशास्त्र किंवा वाणिज्य या क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती असतील". सदर अध्यादेशातील बाबींची अंमलबजावणी होणे अत्यंत गरजचे आहे. यासाठी त्या त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची निवड होणे हे अत्यावश्यक आहे. अशा व्यक्ती अन्न प्रक्रिया संघ तसेच इतर स्वंयसेवी संस्थाकडूनही घेण्यात याव्यात तसेच अन्न प्रक्रिया उद्योग विकासासाठी केंद्र शासनाकडून मिळणा-या सुविधा उदा. फुड पार्क,कोल्ड चेन, क्लस्टर, गोडाऊन विकसन इत्यादी साठी मिळणारा निधी राज्यातील तळागळातील शेतक-यांच्या अन्न प्रक्रिया उद्योगाला मिळण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योगासंबंधी देशातील अन्य राज्यामध्ये काय धोरण आहे याबाबतचा शासनाने अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. **त्यासाठी अन्य राज्यांकडून माहिती मागविण्यात यावी व त्यांच्या धोरणांचा अभ्यास करून आपल्या धोरणांत योग्य तो बदल करण्यात यावा. तसेच अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योगासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यासंदर्भात आवश्यक ती कारवाई करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

परिशिष्ट-एक

मूळ विनंती अर्ज

परिशिष्ट - एक

महाराष्ट्र विधानपरिषद

विधान परिषद
महाराष्ट्र

आ.ॲड. रामहरी रुपनवर
सदस्य
विधान परिषद, महाराष्ट्र

१९६
५/१२/१६

प्रति :

मा. सभापती,
महाराष्ट्र विधानपरिषद,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

विषय :- राज्यात अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग प्रभावी प्रभावीपणे राबविण्य आवश्यकता असणे बाबत.

मा. महोदय,

सोबत फळे व भाजीपाला प्रक्रिया महासंघ, महाराष्ट्र राज्य यांचे निवेदन जोडले आहे.

महाराष्ट्र राज्यात अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता : यामुळे शेतीमालाला योग्य भाव मिळतील. ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होईल व परदेशी चलन म प्रमाणात मिळू शकेल. यासाठी खालील बाबींची पूर्तता करण्यात यावी

१) शासन निर्णय ५ जानेवारी, २०१३ नुसार जिल्हा स्तरावर अन्न प्रक्रिया अभियान समिती गठीत करा निर्देश देण्यात आले आहेत. मात्र या निर्णयाची अंमल बजावणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे अन्न प्र अभियान कागदावरच राहिले आहे.

२) अन्न प्रक्रिया फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग विकासासाठी स्वतंत्र विभाग सुरु करण्यात यावा.

३) प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र उद्योग प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात यावे. तालुका स्तरावर प्रशिक्षण देण फिरते प्रक्रिया व केंद्र स्थापन करावीत व यासाठी शासनाने मदत या आणि अशा अनेक मागण्यांच्या अ

सदरचा अर्ज विनंती अर्ज समितीकडे आपल्या शिफारशीसह पाठवण्यात यावा, ही विनंती.

आपला,

(रामहरी रुपनवर
वि.प.स.

मा. सभापती
महाराष्ट्र विधानपरिषद

विनंती अर्ज समिती

निवास : मु.पो.नातेपुते, ता.माळशिरस, जि.सोलापूर - ४१३१०९
मोबा.नं. ९१२२९६८९२६, Email ID : rgrupanwar@rediffmail.com

Reg. No.: F-41764 रजि. क्र. : महा/२०७३/२०१३

फळे व भाजीपाला प्रक्रिया महासंघ, महाराष्ट्र राज्य
Fruits & Vegtables Processing Mahasang, Maharashtra State

पल्लवी आर्टस्, विकास मित्र मंडळ चौक, कर्वेनगर, पुणे ४११०५२
Pallavi Arts, Vikas Mitramandal Chouk, Karvenagar, Pune - 411052 Maharashtra
E-mail : bykpune@rediffmail.com Ph.: 020-25469030 Mob.: 9890942442

प्रति: मा. श्री. रामदास कदम
पर्यावरण मंत्री,

दिनांक: ५/४/२०१५

निवेदन

राज्यात अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग प्रभावी पणे राबविण्याची आवश्यकता आहे. यामुळे शेतीमालाला योग्य भाव मिळतील. ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होईल व परदेशी चलन मोठ्या प्रमाणात मिळू शकेल. यासाठी खालील बाबींची पूर्तता करण्यात यावी.

१) शासन निर्णय ५ जानेवारी २०१३ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा स्तरावर अन्न प्रक्रिया अभियान समिती गठीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र या निर्णयाची अंमल बजावणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे अन्न प्रक्रिया अभियान कागदावरच राहिले आहे.

२) अन्न प्रक्रिया फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग विकासासाठी स्वतंत्र विभाग सुरु करण्यात यावा.

३) प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात यावे. तालुका स्तरावर प्रशिक्षण देण्यासाठी फिरते प्रक्रिया व केंद्र स्थापन करावीत या साठी शासनाने मदत करावी.

४) फळे आणि भाजीपाला प्रक्रिया महासंघास शासनाची मान्यता मिळावी. या संघाला राज्यशासनाने पुणे येथे प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यासाठी जागा व तरतुद उपलब्ध करुन घ्यावी.

५) अन्न प्रक्रिया उद्योगाला डी + झोनच्या सुविधा द्याव्यात.

६) प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी १०० टक्के स्टॅंप ड्युटी माफ असावी. या उद्योगाला कृषीचा भाग म्हणून कृषीच्या दरानुसार विद्युत पुरवठा मिळावा. या उद्योगासाठी लागणारे पाणी शेतीच्या धर्तीवर मिळावे प्रक्रिया उद्योगाला व्हॅट मधून सुट मिळावी.

७) प्रक्रिया उद्योगासाठी एक खिडकी योजना सुरु करावी व सर्व परवाने एकत्र मिळण्याची व्यवस्था व्हावी. भरड धान्य योजना प्रक्रिया उद्योगाप्रमाणे फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योगासाठी लागणारी मशनरी, तज्ञ मार्गदर्शन, खेळते भांडवल, प्रशिक्षण, विक्री व्यवस्था इ. ची सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

कृपया मागे पहावे...

८) अन्नप्रक्रिया उद्योगासाठी एम.आय.डी.सी. मध्ये तयार जागा व यंत्र सामुग्री उपलब्ध करुन द्यावीत.

९) महाराष्ट्र शासन राजपत्र मंगळवार दि. १६ जून २०१५ला उल्लेख केल्या प्रमाणे प्रत्येक बाजार समित्यांवर अन्न प्रक्रिया संघाच्या तज्ञाची नियुक्ती व्हावी. प्रत्येक बाजार समितीने अन्न प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण सुरु करावे.

१०) अन्न प्रक्रिया उद्योग विकासासाठी केंद्र शासनाच्या फुड पार्क, कोल्ड चेन, क्लस्टर, गोडाऊन विकसन, तंत्रज्ञान विकसन, संशोधन विकास, पॅकिंग तंत्रज्ञान, विकीरण विकसन, एकात्मीक शितगृह, मूल्य संवर्धन प्रयोगशाळा, ईरीडेशन सुविधा, इत्यादी पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाची अनुदाने आहेत. त्यांचा उपयोग करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने अंमलबजावणी करण्यात यावी. केंद्र शासनाचा निधी राज्यातील अन्नप्रक्रिया उद्योगाला मिळण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी. यासाठी अन्न प्रक्रिया महासंघाला सहकार्य मिळावे.

११) अन्न प्रक्रिया उद्योग विकासावर चर्चा करण्यासाठी मा. मुख्यमंत्री, मा. कृषीमंत्री, मा. पणन मंत्री व मा. उद्योग मंत्री यांनी प्रत्येक तीन महिन्यातून एकदा चर्चेसाठी वेळ उपलब्ध करुन द्यावी. या प्रक्रिया महासंघाच्या पदाधीकारी प्रक्रिया तज्ञ अन्न प्रक्रिया उद्योजक, यांना या बैठकीसाठी आमंत्रीत करण्यात यावे.

आपला विश्वासू

(बी. के. माने.)
अध्यक्ष
फळे व भाजीपाला प्रक्रिया महासंघ, महाराष्ट्र राज्य
पुणे - ४११०५२.
संपर्क : ९८९०६४२४४२

प्रत
2) विठ्ठल शेवाळे 9970002938
3) Niranjan Modak - 9822046297
4) Biru Kolekar - 9762646663
5) Niharika Khandale - 9467253815
Ashok Prabhakar Gade 9960302650

परिशिष्ट-दोन

विभागाने सादर केलेली माहिती

परिशिष्ट - दोन

ॲड रामहरी रुपनवर, वि.प.स. यांच्या विनंती अर्जातील मुद्दा क्र. ९ या विभागाशी आहे. मुद्दा क्र. ९ ची अद्ययावत माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	मुद्दा	माहिती
९.	महाराष्ट्र शासन राजपत्र मंगळवार दि.१६ जून,२०१५ ला उल्लेख केल्याप्रमाणे प्रत्येक बाजार समित्यांवर अन्न प्रक्रिया संघाच्या तज्ञाची नियुक्ती व्हावी. प्रत्येक बाजार समितींनी अन्न प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण सुरू करावे.	महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनयमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र दि.१६ जून,२०१५ अध्यादेश काढण्यात आलेला आहे. त्यामध्ये (एक) ज्या बाजार समितीचे, मागील लगतच्या बाजार वर्षात कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये बसविलेल्या व गोळा केलेल्या फी पासुन मिळणारे उत्पन्न हे, पाच कोटी रूपयांपेक्षा अधिक असले अशा प्रत्येक बाजार समितीवर चार विशेष निमंत्रित नियुक्त करता येतील, आणि (दोन) ज्या बाजार समितीचे मागील लगतच्या बाजार वर्षात कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये बसविलेल्या व गोळा केलेल्या फी पासून मिळणारे उत्पन्न हे, पाच कोटी रूपयापर्यंत असेल अशा प्रत्येक बाजार समितीवर दोन विशेष निमंत्रित नियुक्त करता येतील अशी तरतुद आहे. ज्या कृषि, कृषि प्रक्रिया, कृषि पणन, कायदा, अर्थशास्त्र किंवा वाणिज्य या क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती असतील. अन्न प्रक्रीया उद्योगाबाबत प्रशिक्षण देणे ही बाब उद्योग विभागाशी निगडीत असुन कृषी उत्पन्न बाजारउ समितीशी निगडीत नाही.

(शा.म.मु.) एचबी २४१४—३ (३५०—२-२०१९)

RNI No. MAHBIL/2009/35530

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष १, अंक २६] मंगळवार, जून १६, २०१५/ज्येष्ठ २६, शके १९३७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ३९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४.—महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश . . . . . पृष्ठे १-३

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जून २०१५.

MAHARASHTRA ORDINANCE No. XIV OF 2015.

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1963.

सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४.

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

आणि ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) १९६४ चा अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे महा. २०. आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

त्याअर्थी, आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१५ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६४ च महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १३ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ याच्या कलम १३ मध्ये १९६४ चा महा. २०. पोट-कलम (१ब) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(१क)(अ) राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ,—

(एक) ज्या बाजार समितीचे, मागील लगतच्या बाजार वर्षात कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये बसविलेल्या व गोळा केलेल्या फी पासून मिळणारे उत्पन्न हे, पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल अशा प्रत्येक बाजार समितीवर चार विशेष निमंत्रित नियुक्त करता येतील ; आणि

(दोन) ज्या बाजार समितीचे, मागील लगतच्या बाजार वर्षात कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये बसविलेल्या व गोळा केलेल्या फी पासून मिळणारे उत्पन्न हे, पाच कोटी रुपयांपर्यंत असेल अशा प्रत्येक बाजार समितीवर दोन विशेष निमंत्रित नियुक्त करता येतील,

ज्या, कृषि, कृषि प्रक्रिया, कृषि पणन, कायदा, अर्थशास्त्र किंवा वाणिज्य या क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्ती असतील.

(ब) खंड (अ) अन्वये नियुक्त केलेल्या विशेष निमंत्रितांना बाजार समितीच्या चर्चामध्ये भाग घेण्याचा हक्क असेल, परंतु तिच्या सभेमध्ये मतदान करण्याचा हक्क असणार नाही.

(क) विशेष निमंत्रितांचा पदावधी हा, बाजार समितीच्या सदस्यांच्या पदावधीइतकाच असेल.".

निवेदन

बाजार क्षेत्रात शेतीच्या व इतर विवक्षित उत्पन्नाच्या पणनाचा आणि त्यासाठी राज्यात स्थापन केलेल्या बाजारांचा तसेच खाजगी बाजारांचा व शेतकरी-ग्राहक बाजारांचा विकास व विनियमन करणे, अशा बाजारांच्या संबंधात स्थापन करावयाच्या किंवा बाजारांशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी कार्य करणाऱ्या बाजार समित्यांना अधिकार प्रदान करणे, बाकरिता महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (सन १९६४ चा महा. २०) हा अधिनियमित केला आहे.

२. उक्त अधिनियमाखाली घटित केलेल्या बाजार समित्यांचे कार्य अधिकाधिक कार्यक्षमतेने व सुरळीतपणे चालावे याची सुनिश्चिती करण्यासाठी, महाराष्ट्र शासनास, कृषि, कृषि प्रक्रिया, कृषि पणन, कायदा, अर्थशास्त्र किंवा वाणिज्य या क्षेत्रांमधील तज्ज्ञ व्यक्तींची बाजार समित्यांवर विशेष निमंत्रित म्हणून नियुक्ती करणे इष्ट वाटते, जेणेकरून बाजार समित्यांना अशा तज्ज्ञ व्यक्तींच्या ज्ञानाचा फायदा करून घेता येईल. तसेच अशा विशेष निमंत्रितांना, बाजार समितीच्या चर्चेत भाग घेण्याचा हक्क असेल परंतु, त्यांना त्यात मतदान करण्याचा हक्क असणार नाही अशीही तरतूद करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्या प्रयोजनांसाठी, उक्त अधिनियमाच्या कलम १३ मध्ये एक नवीन पोट-कलम (१क) समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केले आहे.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (सन १९६४ चा महा. २०) यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जोपुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १२ जून २०१५.

चे. विद्यासागर राव,
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

डॉ. सुबीर कुमार गोयल,
शासनाचे अपर मुख्य सचिव.

BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना १:९ या प्रमाणात रा.स.वि.नि. योजनेअंतर्गत अर्थसहाय्य योजनेची माहिती

राज्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतीमालास योग्य व रास्त भाव मिळावा व त्यानुषंगाने पूरक रोजगार निर्मिती व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजनेंतर्गत राज्यातील कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना कर्ज आणि शासकीय भागभांडवल उपलब्ध करुन देण्याकरिता शासनहमीवर पुढीलप्रमाणे आकृतीबंध लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय शासन निर्णय क्र.प्रक्रिया-११२००४/ प्र.क्र.१६२(अ)/९-स, दि.१२ ऑक्टोबर, २००७ अन्वये शासनाने घेतला आहे.

(रुपये लाखात)

अ.क्र.	तपशिल	प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात अर्थसहायाची टक्केवारी	आर्थिकबंध (कमाल रु.५००.०० लाख)
१	राज्य शासनाच्या हमीवर राष्ट्रीय सहकारी विकास निगम किंवा इतर वित्तीय संस्थेकडून कर्ज.	६०%	३००.००
२.	राज्य शासनाचे भाग-भांडवल	३६%	१८०.००
३.	संस्थेचे स्व-भाग भांडवल	०४%	२०.००
	एकूण :-	१००%	५००.००

०२. सदर योजनेअंतर्गत सन २०१५-१६ अखेर वरील आकृतीबंधानुसार एकूण ११२ कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना एकूण रू ३३४.३६ कोटी (रासविनि कर्ज रू. २१५.४९ कोटी, रासविनि भागभांडवल रू. ८३.१९ कोटो व शासकीय भागभांडवल रू. ३५.६८ कोटी) अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहेत. ११२ कृषी प्रक्रीया सहकारी संस्थांपैकी ५ संस्थांनी संपुर्ण अर्थसहाय्याची परतफेड केली आहे.

०३. सद्दस्थितीमध्ये उपरोक्त ११२ संस्थांपैकी २५ संस्था बंद, १४ संस्था अवसायनामध्ये, २७ संस्था उभारणीखाली, ४६ संस्था चालु आहेत. सदर १०७ कृषी प्रक्रीया सहकारी संस्थांचे एकूण रू.२३२.५९ कोटी (रासविनि कर्ज रू. १६५.१२ कोटी, रासविनि भागभांडवल रू. ५२.१९ कोटी व शासकोय भागभांडवल रू. १५.२८ कोटी) थकीत आहे.

०४. शासनाने मान्यता प्रदान केलेल्या एकूण १८ कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांना अर्थसहाय्य वितरीत करण्याचे शासनावर सद्यस्थितीत दायित्व आहे

****

परिशिष्ट - सेन - अ

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र. ०२२ - २२०२ ५४२६.
ईमेल : ravindra.giri@nic.in

क्रमांक: राअअ-१९१७/प्र.क्र.६९/१४-९
कृषि व पदुम विभाग, खोली क्र. ५४३,
मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ०३२.
दिनांक : २७ सप्टेंबर, २०१७

प्रति,

अवर सचिव (समिती),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई-३२

विषय :- "राज्यात अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग राबविण्याची आवश्यकता असणेबाबत" या विषयावरील ॲड.रामहरी रुपनवर, वि.स.स. यांचा विनंती अर्ज.

संदर्भ :- आपले पत्र क्र.२५८२१/म.वि.स./विषअधिरा/ड-१५, दिनांक १८ सप्टेंबर, २०१७

महोदय,

संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने या कार्यसनाशी संबंधित मुद्दा क्र.१, २ व ३ बाबत अद्ययावत माहितीच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

आपला,

(र.इ.गिरी)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

सोबत :- वरीलप्रमाणे

प्रत :

३) कक्ष अधिकारी (१२-ड), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

४) निवडनस्ती -१४-ड

मुद्दा क्र.१ :- शासन निर्णय ५ जानेवारी २०१३ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा स्तरावर अन्न प्रक्रिया अभियान समिती गठीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र या निर्णयाची अंमल बजावणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे अन्न प्रक्रिया अभियान कागदावरच राहिले आहे .

वस्तुस्थिती - केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न प्रक्रिया अभियान ही योजना सन २०१५-१६ या आर्थिक वर्षापासून बंद केलेली असून सदर योजना राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात चालू ठेवावी किंवा कसे याबाबत निर्णय घेण्याचे केंद्र शासनाने कळविले होते. त्यानुसार राज्याच्या अर्थसहाय्यातून राबविण्यात येणारी कृषि व अन्न प्रक्रिया ही नवीन योजना राज्यात राबविण्याबाबतचा धोरणात्मक निर्णयाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. दिनांक ३०.०५.२०१७ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये "मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना" राज्यात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून दिनांक २० जून, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवीन योजना राज्यात सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे

मुद्दा क्र.२ :- अन्न प्रक्रिया फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग विकासासाठी स्वतंत्र विभाग सुरु करण्यात यावा.

वस्तुस्थिती - अन्न प्रक्रिया फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग विकासासाठी विकास (उद्योग) यांचे अधिपत्याखाली कृषि प्रक्रियेकरिता स्वंतत्र विभाग निर्माण करण्यास मा.मुख्यमंत्री महोदयांनी अनुकूलता दर्शविली असून कृषि विभाग व उद्योग विभाग संयुक्तीकरित्या स्वतंत्र विभाग/यंत्रणा सुरु करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

मुद्दा क्र.३:- प्रत्येक जिल्हयासाठी स्वतंत्र प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात यावे. तालुका स्तरावर प्रशिक्षण देण्यासाठी फिरते प्रक्रिया व केंद्र स्थापन करावीत या साठी शासनाने मदत करावी.

वस्तुस्थिती- दिनांक २० जून, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवीन योजना राज्यात सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयात नवीन योजनेच्या स्वरुपात प्रशिक्षणाबाबत खालीलप्रमाणे तरतूद केलेली आहे.

मुद्दा क्र.४.३ मनुष्य बळ निर्मिती व विकास योजना:-

इ) पात्र उद्योग:- अन्न प्रक्रिया प्रकल्पांकरिता Central food Technological Research Institute (CFTRI), National Institute of food Technology Enterpreneurship and Management(NIFTEM), State Agriculture Universities (SAU) इत्यादी केंद्र/राज्य संस्थांकडुन प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मिती.

ई) आर्थिक सहाय्य:- प्रशिक्षण शुल्काच्या ५० टक्के.

केंद्र शासनाच्या अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाने मॉडेल फुड प्रोसेसिंग पॉलिसीचा मसुदा राज्य शासनास पाठविला असून राज्याने या मसुद्यानुसार आपले अन्न प्रक्रिया धोरण निश्चित करण्यास कळविले आहे. केंद्र शासनाने दिलेल्या प्रारुपानुसार राज्य शासनाने स्वत:चे अन्न प्रक्रिया धोरण २०१७ चे प्रारुप तयार केले असून सदर धोरणाच्या मसुदयातील मुद्दे अनेक विभागाशी संबंधित आहे.यास्तव सदर धोरणाचा मसुदा उपरोक्त विभागांकडे अभिप्रायार्थ पाठविण्यात आला. त्यापैकी काही विभागाचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत. अन्न प्रक्रिया व कृषि उद्योग प्रक्रिया उद्योग धोरण तयार करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १३/०९/२०१७ रोजी बैठक घेण्यात आली. त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

परिशिष्ट दोन - ब

दि २८ सप्टेंबर २०१७

विषय :- राज्यात अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रीया उद्योग प्रभाविपणे राबविण्याची आवश्यकता असले बाबत.

संदर्भ :- कक्ष अधिकारी, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग-२) यांचे कडील पत्र दिनांक २२/०९/२०१७.

उपरोक्त विषया बाबत मा.श्री. ॲड रामहरी रुपनवर, विधान परिषद सदस्य यांच्या विनंती अर्जामधील संदर्भिय पत्राने मागवलेल्या उद्योग संचालनालयाशी निगडीत मुद्दयाबाबतची माहिती खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	मुद्दा	अभिप्राय
५	अन्न प्रक्रीया उद्योगाला डी + झोनच्या सुविधा द्याव्यात	शासना मार्फत उद्योगाना चालना देण्यासाठी नविन औद्योगिक धोरण -२०१३ नुसार सामुहिक प्रोत्साहन योजना राबविण्यात येते. दि.०१/०४/२०१३ च्या शासन निर्णयाने शासनाने साप्रोयो -२०१३ अमलात आणली असून योजनेचा कालावधी ०१/०४/२०१३ ते ३१/०३/२०१८असा आहे. सदर योजने (परिच्छेद क्र. ४.१ (ब)) नुसार राज्यात स्थापन होणाऱ्या अन्न व कृषी प्रक्रीया उद्योगास इतर उद्योग घटकापेक्षा वाढीव १० टक्के अनुदान व अनुदान उपभोगण्याचा कालावधी एक वर्ष वाढवून देण्यात आलेला आहे.
६	कृषी उद्योग उभारणीसाठी १०० टक्के स्टॅम्प डयूटी माफ असावी.या उद्योगाला कृषीचा भाग म्हणून कृषीच्या दरानुसार विद्युत पुरवठा मिळावा. या उद्योगासाठी लागणारे पाणी शेतीच्या धर्तीवर मिळावे, प्रक्रीया उद्योगाला व्हॅट मधून सूट मिळावी.	१) सामुहिक प्रोत्साहन योजना -२०१३ अंतर्गत राज्यामध्ये अ व ब वर्गीकरण तालुक्यां-व्यतिरीक्त इतर ठिकाणी स्थापीत होणाऱ्या सर्व प्रकारच्या नवीन/ विस्तारीकरण प्रकल्पांना जमीन संपादनासाठी /जमीनीचा/गाळयाचा भाडेपट्टा करार व भाडेपट्टा कराराचे हस्तांतरण तसेच दिर्घ मुदतीच्या कर्जाचे गहाण खत करण्यासाठी मुद्रांक शुल्क माफी अनुज्ञेय आहे. २) राज्यातील अन्न प्रक्रीया उद्योगास विजदर संबंधित पात्र घटकांना खालील प्रमाणे प्रोत्साहन अनुदान अनुज्ञेय आहेत. १) विद्युत शुल्क माफी २) विद्युत दर अनुदान ३) GST पात्र घटकांना GST वर आधारीत औद्योगिक प्रोत्साहन अनुदान (IPS) अनुज्ञेय करण्यात येत आहे.
८	अन्नप्रक्रिया उद्योगासाठी	राज्यात एम.आय.डी.सी मार्फत त्यांचे प्रचलित धोरणानुसार उद्योग उभारणीसाठी पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन

	एम.आय.डी.सी मध्ये तयार जागा व यंत्र सामुग्री उपलब्ध करुन द्यावीत.	दिल्या जातात. तसेच अन्न प्रक्रीया उद्योगांना उद्योग उभारतांना लागणारी यंत्रसामुग्री स्वतः अर्थसहाय्य उपलब्ध करुन उभारणी करावी लागते.

मा.विकास आयुक्त (उद्योग)
यांचे मान्यतेने

परिशिष्ट–दोन-क

महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्र.०२०-२२८५२७५२

क्र.प्रक्रिया-१११७/प्र.क्र.१४०/९-स
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक:- [illegible] JUN 2018

प्रति,
श्री. संजय कांबळे,
अवर सचिव (समिती),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
मुंबई-४०००३२

विषय:- "राज्यात अन्न, फळ व भाजीपाला प्रक्रिया उद्योग प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता असणेबाबत" या विषयावरील ॲड रामहरी रुपनवर, वि.प.स. यांचा अर्ज.
संदर्भ:- आपले पत्र क्र. १५५०७/म.वि.स./विपविअस/ड-१५,दि. ०८.०६.२०१८

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने ॲड रामहरी रुपनवर, वि.प.स. यांच्या विनंती अर्जातील मुद्दा क्र. १ या विभागाशी संबंधीत असल्याने त्याबाबतची अद्ययावत माहिती ४० प्रतीत खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

मुद्दा क्र.	मुद्दा	माहिती
१.	महाराष्ट्र शासन राजपत्र दि.१६ जून,२०१५ ला उल्लेख केल्याप्रमाणे प्रत्येक बाजार समित्यांवर अन्न प्रक्रिया संघाच्या तज्ञाची नियुक्ती व्हावी. प्रत्येक बाजार समितींनी अन्न प्रक्रिया उद्योग प्रशिक्षण सुरू करावे.	महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनयमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र दि.१६ जून,२०१५ अध्यादेश काढण्यात आलेला आहे. त्यामध्ये (एक) ज्या बाजार समितीचे, मागील लगतच्या बाजार वर्षात कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये बसविलेल्या व गोळा केलेल्या फी पासुन मिळणारे उत्पन्न हे, पाच कोटी रूपयांपेक्षा अधिक असले अशा प्रत्येक बाजार समितीवर चार विशेष निमंत्रित नियुक्त करता येतील, आणि (दोन) ज्या बाजार समितीचे मागील लगतच्या बाजार वर्षात कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये बसविलेल्या व गोळा केलेल्या फी पासून मिळणारे उत्पन्न हे, पाच कोटी रूपयापर्यंत असेल अशा प्रत्येक बाजार समितीवर दोन विशेष निमंत्रित नियुक्त करता येतील अशी तरतुद आहे. ज्या कृषि, कृषि प्रक्रिया, कृषि पणन, कायदा, अर्थशास्त्र किंवा वाणिज्य या क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती असतील.

आपला,
(का.गो. वळवी)
उप सचिव (पणन), महाराष्ट्र शासन

मत:-निवडनस्ती/९-स

परिशिष्ट - तीन

समितीच्या बैठका

पहिली बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक मंगळवार, दिनांक ३ ऑक्टोबर २०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :

श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख

विशेष निमंत्रित :

ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः

श्री. विलास आठवले, उप सचिव.
श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

विभागीय अधिकारी मंत्रालय :-

(१) डॉ. हर्षदिप कांबळे, विकास आयुक्त, उद्योग विभाग
(२) श्री. संजय देवगांवकर, सहसचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभाग
(३) श्री. एस. व्ही. पाटील, सह संचालक, उद्योग विभाग
(४) श्री. क. अ. वंजारे, उप सचिव, कृषि व पदुम (कृषि) विभाग
(५) श्री. के. जी. वळवी, उप सचिव, पणन व सहकार, वस्त्रोद्योग (पणन) विभाग

समितीने विनंती अर्जाच्या संदर्भात विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग), कृषि व पदुम (कृषि) व सहकार, पणन व वस्त्रोद्योग (पणन) विभागाच्या व अन्य अधिका-यांच्या साक्षी नोंदविल्या.

दुसरी बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक सोमवार, दिनांक ११ जून, २०१८ रोजी दुपारी १२-०० वाजता कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :

(१) श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.
(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.
(३) श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.
(४) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

विशेष निमंत्रित :

(१) ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.
(२) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.
(३) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
(२) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

विभागीय अधिकारी, मंत्रालय :

(१) श्री. विजय कुमार, अपर मुख्य सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग (पणन) विभाग
(२) श्री. संजय देवगांवकर, सह सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभाग
(३) श्री. हर्षदिप कांबळे, विकास आयुक्त, उद्योग विभाग
(४) श्री. के. जी. वळवी, उप सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग (पणन) विभाग
(५) श्री. श्रीकांत आंडगे, उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभाग
(६) श्री. अ. एल. घोलकर, सह संचालक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग (पणन) विभाग
(७) श्री. ए. जी. चालक, उप संचालक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग (पणन) विभाग

समितीने विनंती अर्जाच्या संदर्भात विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग (पणन), कृषि व पदुम (कृषि) विभाग. व अन्य अधिका-यांच्या साक्षी नोंदविल्या.

तिसरी बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक मंगळवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजी सकाळी ११-०० वाजता कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :

(१) श्री. शरद रणपिसे, वि.प.स. तथा समिती प्रमुख.
(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.
(३) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
(४) श्री. किरण पावसकर, वि.प.स.

विशेष निमंत्रित :

(१) ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.
(२) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.
(३) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)
(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (स.)
(३) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

सदर बैठकीत समितीने प्रारूप अहवालावर विचारविनिमय करून तो समंत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई